## प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १०.०३.२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आलोसे १)श्री.गौरव अरुण भगत वय—३८ वर्ष,पद— सहायक नगर रचनाकार,रा.फलॅट क्र. ६०३ जास्वंद बिल्डींग,गार्डन सिटी अपार्टमेंट,अमरावती वर्ग — २<br>आलोसे २) श्री.तुषार अनिल नंद वय—३८ वर्ष,पद— सहायक नगर रचनाकार,रा.प्लॉट क्र.१०३ ,सदयोग अपार्टमेंट,MIDC कॉलनी,अमरावती, वर्ग — १<br>आरोपी क्र. ३ श्री.अमन सुभाष भंडारी वय— २८ व्यवसाय—खाजगी इंजिनिअर रा.कांडली ता.अचलपुर जि.अमरावती खाजगी व्यक्ती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १०/०३/२०२६ चे १६/०२ ते १६/३३ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | १००,०००/—रुपये |
| ५ | तडजोडीअंती लाच रक्कम | १००,०००/— रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १००,०००/— रूपये |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक १०/०३/२०२६ रोजी तक्रार दिली की, त्यांची मौजे खेलतपमाळी ता.अचलपुर जि.अमरावती येथील सर्व्हे नं १०८/१/अ मध्ये त्यांचे काका आणि आई याचे नावे सामाईक रित्या ९७ आर शेतजमीन आहे. या शेतजमीनीवर निवाशी रहीवाशी प्रयोजनार्थ अकृषक करुन त्यावर लेआउट करण्याकरीता खाजगी इंजीनीअर मार्फत मा.सहायक संचालक, नगररचना शाखा कार्यालय अमरावती या कार्यालयात शासनाच्या BPMS ONLINE प्रणाली मार्फत अर्ज दाखल केला होता.

मा.सहायक संचालक, नगररचना शाखा कार्यालय अमरावती या कार्यालयातील श्री गौरव अरुण भगत, सहायक नगर रचनाकार व श्री तुषार अनिल नंद, नगर रचनाकार, यांना तक्रारदार भेटले असता त्यांनी सागितले की, तुमचे जवळपास २.५ एकरचे (९७ आर) लेआउट आहे. आम्ही ४०,०००/—रुपये प्रती एकर प्रमाणे लेआउट पास करुन घ्यावयाचे असेल तर तुम्हाला आम्हाला १ लाख रुपये दयावे लागतील अशी लाचेची मागणी केली.

दि. १०/०३/२०२६ रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष आलोसे क्र. १. श्री गौरव अरुण भगत १००,०००/— रू. लाचेची मागणी केल्याचे तसेच आलोसे क्र.२ श्री.तुषार नंद यांनी सदर लाच मागणीला प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले व सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १. श्री गौरव अरुण भगत यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारून टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवली. सदरची रक्कम आरोपी क्र. ३. श्री.अमन सुभाष भंडारी याने आरोपी क्र.१ श्री.भगत यांना मदत करण्याच्या व पुरावा नष्ट करण्याचा उददेशाने आपल्या स्वत:च्या पॅन्ट च्या खिशात लपवून ठेवली. पंच क्र.१ यांचे सांगण्यावरुन आरोपी क्र. ३. श्री.अमन सुभाष भंडारी यांना ताब्यात घेउन त्यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत करण्यात आली. वरून तिन्ही आरोपीतांन विरूध्द पोलीस स्टेशन गाडगे नगर ला गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री. सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,सापळा अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, पो.उप.अधी.श्री मंगेश मोहोड, पो.नि.ज्ञानोबा फड, पोलीस अंमलदार युवराज राठोड, वैभव जायले,आशिष जांभोळे, चालक श्री.सतिश किटुकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क:

१)मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,मो.क्र.९०११३२३४२६

२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,मो.क्र.९७६४२१०४८५

३)श्री.सुनिलकिनगे,पोलीस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती,मो.क्र.९८२३१११११५५,७५१७५७१०६४

कार्यालयीन पत्ता—अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,

ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर—१०६४

पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

SUNIL V. KINGE
Dy.Superintendent of Police
Anti Corruption Bureau

Scanned with OKEN Scanner